| MHBI100002252020 | दाखल दिनांक | :– | २७/०१/२०२० |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | :– | २८/०१/२०२० |
| | निकाल दिनांक | :– | ३०/०३/२०२६ |
| | कालावधी | :– | ०६ व. ०२ म. ०३ दिवस |

# प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, केज, ता. केज, जि. बीड यांचे न्यायालयात

**( पीठासीन अधिकारी – सुरेश एस.बडगुजर)**

**नि.फौ.ख.क्र. ०९/२०२०**

**निशाणी क्र. ४७/ब**

**गु.र.नं. २०७/२०१९**

**युसूफवडगांव पोलिस ठाणे.**

**सरकारपक्ष** ] **महाराष्ट्र शासन,**
] मार्फत पोलिस ठाणे अंमलदार, पोलिस ठाणे, युसूफवडगांव ता.
] केज, जि. बीड.

**प्रतिनिधीत्व** ] श्री एस. एन. अंबेकर, सहाय्यक सरकारी वकील

**–विरुद्ध–**

**आरोपी** ] **१. लखन अर्जुन शिंदे,**
वय :– २२ वर्ष, व्यवसाय :– शेती,
रा. सादोळा ता. केज जि. बीड
] **२. अर्जुन बाबुराव शिंदे,**
वय :– ५६ वर्ष, व्यवसाय :– शेती,
रा. सादोळा ता. केज जि. बीड

**प्रतिनिधीत्व** ] ॲड. श्रीमती ए. आर. मुंडे

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | १९.१२.२०१९ |

| | | | |
|---|---|---|---|
| २) | प्रथम वर्दी अहवाल नोंदविल्याचा दिनांक | :– | २०.१२.२०१९ |
| ३) | दोषारोप दाखल केल्याचा दिनांक | :– | २८.०१.२०२० |
| ४) | दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :– | ०३.१२.२०२१ |
| ५) | पुरावा सुरू केल्याचा दिनांक | :– | १०.०४.२०२४ |
| ६) | निकालासाठी राखीव ठेवल्याचा दिनांक | :– | निकालासाठी राखीव ठेवला नाही |
| ७) | निकाल घोषीत केल्याचा दिनांक | :– | ३०.०३.२०२६ |
| ८) | शिक्षा सुनावली असल्यास आदेश दिनांक | :– | निरंक |

## <u>आरोपीची माहिती</u>

| आ. क्र. | आरोपींची नांवे | अटक दिनांक | जामिनावर मुक्त दिनांक | ठेवण्यात आलेल्या दोषारोपाची कलमे | निर्दोष किंवा शिक्षा | शिक्षेचे वर्णन | फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता कारागृह कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १.<br>२. | लखन अर्जुन शिंदे,<br>अर्जुन बाबुराव शिंदे, | फौजदारी प्र.स.कलम ४१ (अ) प्रमाणे नोटीस दिली | ०३.१२.२०२१ | भा.दं.वि.चे कलम ३२४, ३२३, ५०४, सह कलम ३४ | निर्दोष | निरंक | निरंक |

## <u>न्यायनिर्णय</u>

**( दिनांक** ३०.०३.२०२६ **रोजी पारीत )**

आरोपी हे भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम ३२४, ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्यांच्या संपरिक्षणास सामोरे जात आहेत.

०२) **अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.**

तक्रारदार अशोक दत्तु शिंदे हा मौजे सादोळा येथील रहिवाशी आहे. दिनांक १९.१२.२०१९ रोजी दुपारी ०३.०० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी हा त्याचा मित्र चंद्रकांत भास्कर

शिंदे यांचे सोबत वडिलांचे नावे असलेले युसूफवडगाव शिवारातील शेत सर्वे नं.१५७/४ मधील शेतात चक्कर मारण्यासाठी गेला असता, त्याच्या शेतातील पेरणी केलेल्या हरभरा पिकाचे तीन–चार काक–या मोटार सायकलच्या चाका–याने तुडवलेल्या दिसल्या व शेतात आरोपी अर्जुन बाबुराव शिंदे यांनी त्यांची मोटार सायकल उभी केल्याचे दिसल्यामुळे फिर्यादीने त्यांना याबाबत विचारणा केली असता त्यांनी फिर्यादीला शिवीगाळ करुन गंचाडी देवून खाली पाडले त्यावेळी त्याचा मित्र चंद्रकांत शिंदे यांने आमचे भांडणाची सोडवासोडव केली. त्यानंतर फिर्यादी सर्वे नं.२५२ मधील शेतात जात असताना सादोळा गावातील रोडवर डी.पी.च्या पुढे सावंत यांचे शेताजवळ आला असता आरोपी लखन अर्जुन शिंदे हा आला व त्याला काही न बोलता फिर्यादीच्या डावे पायाचे पिंडरीवर त्याचे हातातील कोयत्याने मारुन दुखापत केली त्यानंतर फिर्यादीला विनायक शिंदे, अनुरथ शिंदे, व माझी आई सुरेखा शिंदे, पत्नी उषा शिंदे यांनी विनायक याचे गाडीत फिर्यादीला पोलिस स्टेशन युसूफवडगाव ता.केज येथे येवून आरोपी विरुध्द तक्रार दिली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार युसूफवडगाव पोलिस स्टेशन येथे गु. र. क्र. २०७/२०१९ नुसार व कलम ३२४, ३२३, ५०४ सहकलम ३४ भारतीय दंड संहिता नुसार गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पोलिस पो.ना. १५४४ श्री.ए.डी.पिंपळे यांच्याकडे सोपविण्यात आला होता. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा व जप्ती पंचनामा केला. जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. साक्षीदारांचे जबाब नोंदवले. तपास पुर्ण झाल्यानंतर आरोपीविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम १७३ (२) नुसार दोषारोप पत्र दाखल केले.

**०३)** आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३२४, ३२३, ५०४ सहकलम ३४ अन्वये दोषारोप निशाणी क्रमांक १० वर निश्चीत करण्यात आला. दोषारोप आरोपींस वाचुन व त्यांच्या भाषेत समजावुन सांगण्यात आला. आरोपींनी निशाणी ११ व १२ वर गुन्हा कबुल केला नाही व संपरिक्षणास सामोरे जाण्याची इच्छा व्यक्त केली. त्याचा बचाव पुर्णपणे नकाराचा होता.

**०४)** अभियोगपक्षाचे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री एस. एन. अंबेकर आणि आरोपीचे वकील श्रीमती ए.आर.मुंडे यांचा युक्तीवाद ऐकला. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ माझ्या समोर आले.

त्यावरील निष्कर्ष कारणांसहित मी खालील प्रमाणे दिलेली आहे.

| मुद्दे | | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक १९.१२.२०१९ रोजी दुपारी ०३.०० ते ४.१५ वाजणेच्या सुमारास मौजे सादोळा ता.केज जि.बीड येथील फिर्यादीच्या शेतामध्ये आरोपींनी सामाईक हेतुने फिर्यादी अशोक दत्तु शिंदे यास कोयता यासारख्या घातक हत्याराने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली? | :– | नाही. |
| २ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी सामाईक हेतुने फिर्यादी अशोक दत्तु शिंदे यास मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली ? | :– | नाही. |
| ३ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त वेळी, ठिकाणी व वेळी आरोपींनी सामाईक हेतुने फिर्यादी अशोक दत्तु शिंदे याचा उद्देशपुर्वक अपमान करुन त्यास पक्षोभित केले व अशा प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडून शांततेचा भंग झाला ? | :– | नाही. |
| ४ | आदेश काय? | :– | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

०५) अभियोग पक्षातर्फे एकुण सहा साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली. सतिष अभिमन्यू शिंदे (सा.क्र.१ नि.क्र १९), भाउसाहेब आबाराव रोडगे (सा.क्र.२ नि.क्र २१), दिलीप फकीरा पौळ(सा.क्र.३ नि.क्र २४), गणेश नागनाथ कोरसळे(सा.क्र.४ नि.क्र २६), हे पंच साक्षीदार आहेत. चंद्रकांत भास्कर शिंदे(सा.क्र.५ नि.क्र २९) हा साक्षीदार आहे. डॉ. नंदकुमार

सदाशिव नेहरकर(सा.क्र.६ नि.क्र ३८) हे वैदयकीय अधिकारी आहेत. सरकार पक्षाच्या इतर साक्षीदारांना वेळोवेळी समन्स पारीत करुनही साक्षीदार हजर न झाल्यामुळे, निशाणी क्रमांक १ वरील आदेशाप्रमाणे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहीता,१९७३ चे कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन नोंदविले निशाणी क्र.४५ व ४६ वर नोंदवण्यात आले असता आरोपीने उपलब्ध पुरावा खोटा असल्याचे कथन केले आहे. बचाव पक्षातर्फे पुरावा सादर करण्यात आला नाही.

०६) अभियोग पक्षाचे विधीज्ञ श्री.एस.एन.अंबेकर यांनी युक्तीवाद केला की, डॉक्टर नेहरकर यांनी अभियोग पक्षास पुरक साक्ष दिली आहे. अभियोग पक्षाने वैद्यकीय प्रमाणपत्र् सिद्ध केले आहे. अभियोग पक्षाने घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा यातील पंचाच्या सह्या सिद्ध केल्या आहेत. त्यामुळे अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द केला आहे. सबब आरोपींना शिक्षा देण्याची विनंती केली आहे.

०७) आरोपीचे विधीज्ञ श्रीमती . ए.एन मुंडे यांनी युक्तीवाद केला की, अभियोग पक्षाने फिर्यादी तपासला नाही, त्यामुळे फिर्याद सिध्द झाली नाही. तसेच अभियोग पक्षाने तपासी अधीकारी यांची साक्ष पटलावर आणलेली नाही. त्यामुळे गुन्हयाची साखळी सिध्द झाली नाही. अभियोग पक्षाने गुन्हा शंकेपलीकडे सिध्द केलेला नाही. सबब आरोपींना निर्दोष मुक्त करण्याची विनंती केली आहे.

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ करिता</u> :–**

०८) मुद्दा क्रमांक १ ते ३ चा निवाडा देतेवेळी एकच घटना विचारात घ्यावयाची असल्याने त्याबाबत पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांची कारणमिमांसा एकत्रीतपणे नोंदविणे उचित होईल. त्यामुळे मुद्दा क्रमांक १ ते ३ ची कारणमिमांसा एकत्रीत करण्यात येत आहे.

०९) आरोपींनी सामाईक हेतुने फिर्यादीला घातक हत्याराने किंवा साधनांनी ईच्छापुर्वक

दुखापत केली तसेच फिर्यादी यांचा उद्देशपुर्वक अपमान करुन प्रक्षोभित केले असल्याचे सिध्द करण्याचे दायित्व अभियोग पक्षावर आहे. फौजदारी न्यायतत्वशास्त्रानुसार आरोप करणा–या पक्षाने आरोपीवरील गुन्हा संशयापलीकडे जावून सिध्द करणे आवश्यक असते.

**१०)** सतीश(अ.सा.क्र.१) याने सरतपासात कथन केले की, घटनास्थळ पंचनाम्यावर त्याची सही असून पंचनाम्यातील मजकूर व नकाशा बरोबर आहे. पंचनामा पोलीसांनी वाचून दाखवला.

**११)** उलटतपासात सतीश(अ.सा.क्र.१) याने कथन केले की, पंचनाम्यातील नकाशा पेनने काढला आहे. घटनास्थळाच्या पूर्वेस व पश्चिमस ओम लामतुरेचे शेत, दक्षिणेकडे सादूळा गाव व उत्तरेकडे वडगाव रस्ता आहे. लखन व अर्जनला तो ओळखतो.

**१२)** भाउसाहेब (अ.सा.क्र.२) व दिलीप (अ.सा.क्र.३) हे जप्ती पंचनाम्याचे पंच असून यांनी पंचनाम्यातील सही त्यांची असून पंचनाम्यातील मजकूर त्यांना माहित नसल्याचे कथन केले आहे. पंचसाक्षीदारांनी त्यांच्या साक्षीत पोलीसांनी त्यांच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातून कोयता जप्त केला नसल्याचे तसेच त्यांच्या समक्ष कोणताही पंचनामा केला नसल्याचे कथन केले आहे. सदर पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षास पुरक साक्ष दिली नाही. यामूळे सरकारी वकीलांना न्यायालयाच्या परवानगीने त्यांना उत्तरसूचक प्रश्न विचारले. परंतु आरोपी विरूद्ध कोणतीही गुन्हादर्शक बाब ते अभिलेखावर आणू शकले नाही.

**१३)** गणेश (अ.सा.क्र.४) हा घटनास्थळ पंच आहे. पंच साक्षीदाराने पंचनाम्यातील सही त्याची असून पंचनाम्यातील मजकूर माहिती नसल्याचे कथन केले आहे. पंचसाक्षीदाराने त्याच्या साक्षीत पोलीसांनी त्यांच्या समक्ष कोणताही पंचनामा केला नसल्याचे कथन केले आहे. सदर पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास पुरक साक्ष दिली नाही. यामूळे सरकारी वकीलांनी न्यायालयाच्या परवानगीने त्यांना उत्तरसूचक प्रश्न विचारले. परंतु आरोपी विरूद्ध कोणतीही गुन्हादर्शक बाब ते अभिलेखावर आणू शकले नाही.

**१४)** चंद्रकांत (अ.सा.क्र.५) याने कथन केले की, घटनेबद्दल त्याला काही माहिती नाही. पोलीसांनी त्याची चौकशी केली नाही. चंद्रकांत (अ.सा.क्र.५) याने अभियोग पक्षास सहकार्य न केल्यामुळे सरकारी अभियोक्ता यांना साक्षीदारास सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार देण्यात आली. परंतु, सदर साक्षीदाराने त्याच्या जबाबातील अधोरेखांकित भाग–अ नाकारुन अभियोग पक्षाचे कथन पुर्णपणे नाकारले आहे. सदर साक्षीदाराने आरोपींनी फिर्यादीच्या शेतीतील काकड्या मोटारसायकलने तुडवल्या, याबाबत फिर्यादीने आरोपीस विचारणा केली असता, आरोपींना फिर्यादीला मारहाण केली असल्याचे नाकारले आहे. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास पुरक साक्ष दिलेली नाही.

**१५)** डॉ. नेहरकर (अ.सा.क्र.६) हे वैद्यकीय अधिकारी आहेत. डॉ. नेहरकर (अ.सा.क्र.६) यांनी कथन केले की, ते १९.१२.२०१९ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, युसूफवडगाव येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होते.त्यांनी अशोक दत्तू शिंदे याची तपासणी केली. अशोक दत्तू शिंदे याला 1. CLW Left tibial region of left leg.– size 3X2X1 cm, irregular margins, age of injury less than eight hours, probable weapon – sharp in nature, Nature of injury – simple अशी दुखापत होती. सदर साक्षीदाराने निशाणी क्र. ३९ वर वैद्यकीय दाखला दिला.

**१६)** उलटतपासात डॉ. नेहरकर (अ.सा.क्र.६) यांनी कथन केले की, अशोक दत्तू शिंदे त्यांच्याकडे ०४:०० वाजा तपासणी करिता आला. पोलीसांच्या पत्रावर त्यांनी पोहोच घेतली नाही. परंतु, त्यांच्या कर्मचा–याने पोहोच घेतली. तो अशोक दत्तू शिंदे यास ओळखू शकत नाही. सदर साक्षीदाराने इतर सूचक प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिली आहेत.

**१७)** प्रस्तूत प्रकरणामध्ये भाऊसाहेब (अ.सा.क्र.२) व दिलीप (अ.सा.क्र.३) यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यामूळे जप्ती पंचनामा सिद्ध झाला नाही. तसेच, गणेश (अ.सा.क्र.४) याने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यामूळे घटनास्थळ पंचनामा सिद्ध झाला

नाही. चंद्रकांत (अ.सा.क्र.५) हा घटनेचा साक्षीदार आहे. परंतु त्याने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. सतीष (सा.क्र.१) याच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन करता, त्याने घटनास्थळ पंचनाम्याचा दिनांक व वेळ सांगितली नाही. तसेच, घटनास्थळ पंचनामा कोणी तयार केला याबाबत कथन केले नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष अभियोग पक्षास उपयुक्त नाही. अभियोग पक्षाने नि.क्र.३९ वर वैद्यकिय दाखल्यावर भिस्त ठेवली आहे. डॉ.नेहरकर (अ.सा.क्र.६) याने अशोक दत्तु शिंदे याची तपासणी केली आहे. डॉ.नेहरकर (अ.सा.क्र.६) याने सरतपासात जखमीला जख्मा कशा झाल्या, याबाबत काहीही कथन केले नाही. तसेच नि.क्र.३९ वरील वैद्यकिय दाखल्यात जखमांची पाश्वभुमी नमुद केली नाही. अभिलेखावरील साक्षी पुराव्याचे अवलोकन करता, आरोपीच्या कृत्यामुळे फिर्यादीला जखमा झाल्या असल्याबाबत स्पष्ट पुरावा दिसुन येत नाही. अभियोग पक्षाने फिर्यादी तसेच तपास अधिकारी यांची साक्ष पटलावर आणलेली नाही. एकंदरीत अभियोग पक्षाने घटनेची साखळी सिध्द केलेली नाही. अभियोग पक्षाला आरोपींनी सामाईक हेतुने फिर्यादीला हत्याराने इच्छापुर्वक दुखापत केली असल्याचे सिध्द करण्यात अपयश आलेले आहे. म्हणुन मुद्दा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करिता</u>** :–

१८) मुद्दा क्रमांक १ ते ३ क्रमांक चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविल्याने संशयाचा फायदा आरोपींस होतो. अशा परिस्थितीत आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. या अनुषंगाने मुद्दा क्रमांक ४ च्या उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१} आरोपी क्र.**(१) लखन अर्जुन शिंदे, (२) अर्जुन बाबुराव शिंदे,** यास भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम ३२४, ३२३, ५०४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधातुन फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

२} आरोपींचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात येते.

३} आरोपींनी फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम ४३७ (अ) अन्वये रक्कम रुपये १५०००/–(पंधरा हजार रुपये) चे जामीन व बंधपत्र सादर करावे. सदर जमानत जामीन व बंधपत्र सहा महिन्यापर्यंत अंमलात राहिल.

४} गुन्ह्यात जप्त करण्यात आलेली जी.एम.पी.क्र.६७/२०१९ वरील कोयता मुल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधी संपल्यानंतर त्याचा नियमाप्रमाणे नाश करावा.

५} सदर न्यायनिर्णयाची प्रत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३६५ च्या तरतुदीनुसार मा. जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे पाठविण्यात यावी.

(निकालपत्र खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आले.)

Digitally signed by SURESH SUBHASH BADGUJAR
Date: 2026.04.01 16:40:18 +0530

( **सुरेश एस.बडगुजर** )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, केज
जिल्हा बीड.

ठिकाण :– केज
दिनांक :– ३०.०३.२०२६

**भाग – क**

**जोडपत्र APPENDIX**

**अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालय तर्फे साक्षीदारांची यादी**

**अ) सरकार पक्ष :–**

| साक्षीदार क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराची वर्गवारी | निशाणी क्रमांक. |
|---|---|---|---|
| १) | सतीष अभिमन्यु शिंदे | घटनास्थळ पंच | १९/क |
| २) | भाऊसाहेब आबाराव रोडगे | जप्ती पंच | २१/क |
| ३) | दिलीप फकीरा पौळ | जप्ती पंच | २४/क |
| ४) | गणेश नागनाथ कोरसळे | घटनास्थळ पंच | २६/क |
| ५) | चंद्रकांत भास्कर शिंदे | साक्षीदार | २९/क |
| ६) | डॉ.नंदकुमार सदाशिव नेहरकर | वैदयकीय अधिकारी | ३८/क |

**ब) बचाव पक्षाच्या साक्षीदारांची यादी** :- निरंक

**क) न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी** :- निरंक

**सरकार पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालय तर्फे दस्तऐवजांना निशाणी देण्यात आलेली यादी**

**अ) सरकार पक्ष** :–

| अनु. क्र | निशाणी क्रमांक | दस्तावेजाचे विवरण | दस्तावेजास नि. देण्यात आलेल्या साक्षीदाराचा क्र. |
|---|---|---|---|
| १) | २०/क | घटनास्थळ पंचनामा | अ.सा.क्र.१ |
| २) | ३९/क | वैद्यकिय प्रमाणपत्र | अ.सा.क्र.६ |

**ब) बचाव पक्ष** :– निरंक

**क) न्यायालयातर्फे निशाणी** :– निरंक

**ड) मुद्देमाल / वस्तु** :– निरंक

Digitally signed by SURESH SUBHASH BADGUJAR
Date: 2026.04.01 16:40:36 +0530

ठिकाण :– केज

दिनांक :– ३०.०३.२०२६

( **सुरेश एस.बडगुजर** )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, केज
जिल्हा बीड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

Dictated on : 30.03.2026
Transcribed on : 30.03.2026
Checked & signed on : 30.03.2026

Sd/-
( S.N.Kshirsagar ),
Junior Clerk
Ct. of CJJD and JMFC, Kaij.